MHND090004382019

## निशाणी - ६ खालील आदेश
(दिनांकः०५.०८.२०२३)

१. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.१ यांनी मालमत्तेची कागदपत्रे दाखल करण्याकरीता दिलेल्या नोटीसी रद्दबातल करण्याकरीता तसेच प्रतिवादी क्र.१ यांना स्थावर व जंगम मालमत्ता वादीकडे असलेल्या कर्जाच्या थकबाकीकरीता संलग्न करण्यापासुन प्रतिबंध करण्याकरीता चिरकालीन मनाई हुकूमाकरीता दाखल केला असुन सदर दाव्यात वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

वादीचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे -

२. वादीच्या भोई समाज मच्छीमार सहकारी संस्थेस मत्स्य विभागातर्फे एन.डी.सी.सी योजने अंतर्गत भाग भांडवल म्हणुन रक्कम रुपये २०,००,०००/- मंजुर करण्यात आले. त्यानंतर, वादीच्या संस्थेस लाडका, कापसी, वाळकी, मारताळा येथील तलावाचे २०११ ते २०१७ या कालावधीकरीता वाटप करण्यात आले. वादीच्या संस्थेतर्फे पहिल्या हप्त्याची रक्कम रु.२,५०,०००/- दिनांक १६.८.२०११ रोजी भरण्यात आली. परंतु, तलावात पाण्याच्या टंचाईमुळे मासे योग्यरितीने वाढु शकले नाही. त्यामुळे, वादी संस्थेस प्रचंड नुकसान झाले व त्यामुळे ते पुढचे हप्ते भरु शकले नाहीत. त्यानंतर, मस्त्य विभागातर्फे सदरचे तलाव हे खाजगी पक्षास देण्यात आले. प्रतिवादी क्र.१ आणि ३ यांच्याकडुन कराराच्या अटींचे व शर्थीचे उल्लंघन करण्यात आले. वादी संस्थेतर्फे दिनांक ०४.१०.२०१७, ०२.११.२०१७, १५.०२.२०१८ रोजी प्रतिवादीस पत्रे पाठविण्यात आली. परंतु, प्रतिवादी लक्ष देत नाहीत. त्यानंतर, प्रतिवादी क्र.३ तर्फे वादी संस्थेस दिनांक १८.०१.२०१९ रोजी पहिली नोटीस पाठवुन त्यांना आदेशित केले की, दिनांक ३१.०१.२०१९ पर्यंत किंवा त्यापुर्वी कर्जाची थकबाकी त्वरित जमा करावी आणि असे आदेशित केले की, गहाण ठेवण्यासाठी जंगम आणि स्थावर मालमत्तेची कागदपत्रे द्या. त्यानंतर, प्रतिवादीतर्फे दिनांक ३१.०३.२०१९ आणि १६.०५.२०१९ रोजी नोटीसा पाठविण्यात आल्या आणि असे आदेशित करण्यात आले की, स्थावर मालमत्तेची कागदपत्रे सादर करावी

अन्यथा वादी सोसायटीची राहण्याची मालमत्ता जंगम वस्तुसह जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे, वादी संस्थेच्या सदस्यांच्या मनात भिती निर्माण झाली. प्रतिवादी क्र.१ यांनी तलावाचे वाटप न करता ते हिसकावुन इतरांना वाटप केले आणि वादी सोसायटीला काळ्या यादीत टाकण्याची धमकी दिली. जेणेकरुन त्यांना सर्व सरकारी सुविधा आणि लाभापासुन वंचित ठेवले जाईल. वादी संस्था ही भोई समाजाशी आणि गरीब मच्छीमारांशी निगडीत आहे. त्यांना कोणताही आर्थिक आधार नाही. करीता, वादी संस्थेने सदरचा अर्ज दाखल केला.

३. प्रतिवादी क्र.१ यांना समन्सची बजावणी होऊन ते दाव्यात हजर झाले. परंतू त्यांनी आपला लेखी जबाब दाखल केला नाही. करिता, दिनांक १५.०१.२०२० रोजी निशाणी १ वर आदेश पारित करुन प्रकरण प्रतिवादी क्र.१ विरुध्द विना लेखी जबाब चालविण्यात आले. तसेच, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना समन्सची बजावणी होऊन ते दाव्यात हजर झाले नाहीत. करिता, प्रकरण प्रतिवादी क्र.२ ते ४ विरुध्द दिनांक १५.०१.२०२० रोजी निशाणी १ वरील आदेशान्वये एकतर्फा चालविण्यात आले.

४. अर्जदाराचे कथन लक्षात घेऊन खालील वादबिंदू नोंदविण्यात येऊन त्यावर निष्कर्ष देण्यात आलेले आहेत ते येणेप्रमाणे-

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस ही वादींच्या हक्कात आहे हे वादी सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| २. | दाव्यात सोयीचा समतोल वादींच्या हक्कात असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| ३. | वादींच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश पारीत न केल्यास त्यांची अपरिमीत हानी होणार असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय असावा ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

५. वादीतर्फे दस्तऐवजाची यादी निशाणी ५ प्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र दिनांक ०६.०६.१९८६ ची छायांकित प्रत, तलाव ठेका मंजुरी आदेश जा.क्र.१८७९ दिनांक २९.१२.२०११ ची छायांकित प्रत, तलाव ठेका मंजुरी आदेश जा.क्र.१८६९ दिनांक २९.१२.२०११ ची छायांकित प्रत, जा.क्र.०९-५११ चे मा. उपसचिव, मुंबई यांना दिलेले पत्र दिनांक १३.०२.२००७ ची छायांकित प्रत, ठेका रक्कम भरणा केलेली पावती दिनांक ३१.०३.२०१७ ची छायांकित प्रत, व्याजाची रक्कम भरणा केलेली पावती दिनांक ३१.०३.२०१७ ची छायांकित प्रत, जा.क्र.११५०/२०१४ दिनांक ०८.०८.२०१४ च्या पत्राची छायांकित प्रत, जा.क्र.०९/९६१/२००८ दिनांक २८.०७.००८ च्या कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रत, हमीपत्र दिनांक २८.०६.२०१३ ची छायांकित प्रत, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, मुंबई यांना दिनांक २३.०६.२०१७ रोजीचे हफ्ते परतफेडीबाबत पत्राची छायांकित प्रत, जा.क्र.०११२०५/१४५/२०१७ दिनांक ०७.०८.२०१७ रोजी पाठविलेले पत्राची छायांकित प्रत, जा.क्र.२८५०/२०१७ दिनांक २०.११.२०१७ रोजीचे पत्राची छायांकित प्रत, जा.क्र.२८५१/२०१७ दिनांक २०.११.२०१७ रोजीचे पत्राची छायांकित प्रत, टाकळगांव पाटबंधारे तलावाचे सन २०१७ ते २०२२ पर्यंत तलाव ठेका नुतणीकरण करणे बाबत दिनांक २२.११.२०१७ रोजी पाठविलेले पत्राची छायांकित प्रत, लाडका पाटबंधारे तलावाचे सन २०१७ ते २०२२ पर्यंत तलाव ठेका नुतणीकरण करणे बाबत दिनांक २२.११.२०१७ रोजी पाठविलेले पत्राची छायांकित प्रत, जा.क्र.३०६४/२०१७ दिनांक १४.१२.२०१७ रोजीचे पत्राची छायांकित प्रत, जा.क्र.१७/२०१८ दिनांक ०१.०१.२०१८ रोजीचे पत्राची छायांकित प्रत, दिनांक ०४.१०.२०१७ रोजी सादर केलेला नोटीस खुलासाची छायांकित प्रत, दिनांक ०२.१११.२०१७ रोजी सादर केलेला नोटीसच्या खुलासा दाखल केल्याची छायांकित प्रत, धनादेश क्र.४८९४६३ प्रमाणे रु.२,५०,०००/- भाग भांडवल भरणा करुन पावती मिळणे बाबत दिनांक १६.०८.२०११ च्या पत्राची छायांकित प्रत, वादीतर्फे कर्ज माफी बाबत दिनांक १४.१२.२०१८ रोजीचे पत्राची छायांकित प्रत, जा.क्र.२४/२०१९ दिनांक ०३.०१.२०१९ रोजीचे संस्थेस दिलेले भाग भांडवल

अर्थसहाय्य माफ करणे बाबतच्या प्रस्तावाची छायांकित प्रत, जा.क्र.०११२०/२४/५७७/२०१८ दिनांक २१.०९.२०१८ रोजीच्या पत्राची छायांकित प्रत, जा.क्र. ०७१८०२/१०१/२०१८ दिनांक २९.१२.२०१८ रोजीच्या नोटीसची छायांकित प्रत, जा.क्र.११५/२०१९ दिनांक १८.०१.२०१९ रोजीच्या नोटीस-१ ची छायांकित प्रत, जा.क्र.१२३/२०१९ दिनांक १८.०१.२०१९ रोजीच्या प्रथम नोटीसची छायांकित प्रत, नोटीस चा खुलासा दिनांक २८.०१.२०१९ ची छायांकित प्रत, जा.क्र.५०५/२०१९ दिनांक ३१.०३.२०१९ रोजीच्या नोटीस क्र.२ ची छायांकित प्रत, जा.क्र.५००/२०१९ दिनांक ३१.०३.२०१९ रोजीच्या द्वीत्तीय नोटीसची छायांकित प्रत इत्यादी दस्तऐवज दाखल केली आहेत.

६. वादीच्या वतीने असा युक्तीवाद करण्यात आला की, सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.१ यांनी मालमत्तेची कागदपत्रे दाखल करण्याकरीता दिलेल्या नोटीसी रद्दबातल करण्याकरीता तसेच प्रतिवादी क्र.१ यांना स्थावर व जंगम मालमत्ता वादीकडे असलेल्या कर्जाच्या थकबाकीकरीता संलग्न करण्यापासुन प्रतिबंध करण्याकरीता चिरकालीन मनाई हुकूमाकरीता दाखल केला असून त्यामध्ये दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी संस्था व तिच्या सदस्यांची स्थावर व जंगम मिळकत जप्त करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मागितला असून असा युक्तीवाद केला की, वादी संस्थेने लाडका, कापशी, मारतळा व इतर असे ५ तलाव २०११ ते २०१७ या पाच वर्षांकरिता घेतले असून त्यावर शासनाकडून शासकिय योजनेंतर्गत रु.२०,००,०००/- चे कर्ज घेतले आहे व सन २०११ मध्ये पहिला हफ्ता रु.२,५०,०००/- हा दिला असून त्याबाबतचे दिनांक ०१.०१.२०१८ रोजीचे पत्र दस्तऐवज क्र.२० वर दाखल केले आहे. परंतु, त्यानंतरचे हफ्ते वादी संस्थेने भरले नाहीत. त्यानंतर प्रतिवादी क्र.३ ने वादी संस्थेला दिलेले ५ तलाव काढुन घेतले व वादीने वेळोवेळी अर्ज देऊनही त्याचा काहीही उपयोग झाला नाही व त्यानंतर प्रतिवादीने दिनांक १८.०१.२०१९ रोजी पहिली नोटीस व ३१.०३.२०१९ रोजी नोटीस क्र.२ व ३१.०३.२०१९ रोजी द्वीतीय नोटीस दिली. अशा परिस्थितीत, सदरच्या नोटीसच्या अंमलबजावणीला दाव्याचा निकाल लागेपर्यंत तात्पुरती स्थगिती मिळण्याकरिता विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र.१ यांनी दाव्यात हजर होऊन आपला लेखी जबाब दाखल केला नाही. तसेच, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना समन्सची बजावणी होऊन ते दाव्यात हजर न झाल्यामुळे प्रकरण त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले. करिता, त्यांच्यावतीने कोणताही युक्तीवाद करण्यात आला नाही.

मुद्दा क्र.१ बाबत -

८. वादीचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी संस्था ही मच्छीमार संस्था असून त्यांना ५ तलाव मच्छीमारीकरिता देण्यात आले होते व त्यावर शासकिय योजनेंतर्गत शासनाकडून सदर संस्थेने रु.२०,००,०००/- कर्ज घेतले असल्याची बाब कागदपत्रावरुन स्पष्ट होते. तसेच, वादी संस्थेने सदरचे रु.२०,००,०००/- कर्ज घेतले असल्याची बाब मान्य केली आहे व त्यापैकी सन २००९-१० चा पहिला हफ्ता रु. २,५०,०००/- हा दिनांक १२.०९.२०११ अन्वये जमा केल्याबाबतचे सहायक आयुक्त, मत्स्य व्यवसाय, नांदेड यांचे दिनांक ०१.०१.२०१८ रोजीचे पत्र दाखल केले आहे. त्यामध्ये दुस-या हफ्त्यापासुन तर शेवटचा म्हणजे आठव्या हफ्त्यापर्यंत येणे बाकी असल्याचे नमूद आहे. याचाच अर्थ असा की, वादी संस्थेने कर्जाच्या परतफेडीकरिता सन २००९-१० च्या पहिल्या हफ्त्याची परतफेड केली असून त्यानंतर कोणताही हफ्ता शासनाकडे जमा केला नाही. त्याचप्रमाणे वादीचेही असेच कथन आहे की, त्यांनी फक्त पहिला हफ्ता जमा केला असून उर्वरित हफ्ते जमा केलेले नाहीत. अशा परिस्थितीत, वादीने दाखल केलेली इतर कागदपत्रे पाहिली असता ४ वर्षे दुष्काळ पडल्यामुळे तलावात मुबलक पाणी साठा उपलब्ध नसल्यामुळे वादी संस्थेला मासे उत्पादन मिळाले नाही व त्यामुळे त्यांनी शासनाकडे कर्ज वसुली बाबतीत सुट मिळण्याकरिता अर्ज केल्याचे दिसून येत आहे. परंतू, सदर बाबीला कोणतेही अंतिम रुप प्राप्त झाले नाही किंवा शासनाच्या वतीने कोणताही आदेश वादी संस्थेला देण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत, वादी संस्थेने शासनाकडून घेतलेले कर्ज हे मान्य असून सदर कर्जाच्या पहिल्या हफ्त्याची परतफेड सुध्दा वादी संस्थेने केलेली आहे. त्यानंतरचे हफ्ते थकित झाले आहेत. त्यामुळे शासनाच्या वतीने वादी संस्थेला दिलेल्या नोटीसा ह्या कर्ज वसुलीकरिता असून वादी संस्थेने कर्जाच्या रक्कमेचा भरणा न केल्यास नियमानुसार कर्जाची वसुली

केल्याबाबतच्या आहेत. अशा परिस्थितीत, प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने दिसुन येत नाही. करीता, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

मुद्दे क्र.२ व ३ बाबत -

९. वादीच्या वतीने करण्यात आलेला युक्तीवाद विचारात घेऊन कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी संस्था ही भोई समाज मच्छीमार सहकारी संस्था मर्यादीत कापशी खुर्द ता. लोहा जि. नांदेड अशी नोंदणीकृत असून त्याबाबत नोंदणी प्रमाणपत्र दाखल केले आहे. अशा परिस्थितीत, वादी संस्थेने शासनाकडून नांदेड जिल्ह्यातील टाकळगाव तलावाचे ३१ हेक्टर जलक्षेत्र व लाडका तलावाचे ६४ हेक्टर जलक्षेत्र असे एकुण ९५ हेक्टर तलाव जलक्षेत्र ठेक्याने ५ वर्षांकरिता घेतले असून त्याबाबतचे आदेश दिनांक २९.१२.२०११ चे २ आदेश अभिलेखावर दाखल केले आहेत. सदर तलावाच्या जलक्षेत्रावर वादी संस्थेने शासनाकडून रु.२०,००,०००/- चे कर्ज घेऊन त्याच्या परतफेडीचा पहिला हफ्ता सन २०११ मध्ये जमा केला परंतु त्यानंतरचा कोणताही हफ्ता वादी संस्थेने भरलेला नाही. वादी संस्थेने शासनाकडे वेळोवेळी कर्जामध्ये सुट मिळण्याकरिता केलेल्या अर्जावर शासनाकडून कोणताही आदेश पारित झाला नाही व वादी संस्थेने शासनाचा कर्ज वसुली बाबत कोणताही आदेश अभिलेखावर दाखल केला नाही. अशा परिस्थितीत, वादी संस्थेने कर्ज घेतल्याची बाब वादी संस्थेला मान्य असून फक्त एकच हफ्ता जमा केला असून उर्वरित हफ्ते जमा केले नसल्याची बाबही अभिलेखावरुन स्पष्ट होते. अशा परिस्थितीत, शासनाने दिलेले कर्ज हे ८ हफ्त्यांमध्ये परतफेड करायची असल्याबाबत दिनांक ०१.०१.२०१८ रोजीच्या प्रतिवादी क्र.२ च्या पत्रावरुन स्पष्ट होते. अभिलेखावर दाखल असलेले सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी संस्थेने रु.२०,००,०००/- कर्ज घेऊन त्यापैकी पहिल्या एका हफ्त्याची परतफेड केली असून उर्वरित हफ्त्यांची परतफेड केली नसल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत, सोयीचा समतोल हा वादीच्या बाजूने नाही. त्याचप्रमाणे, शासनाने शासकिय योजनेंतर्गत कर्ज दिले असून वादी संस्थेला त्याची आठ हफ्त्यांमध्ये परतफेड करणे बंधनकारक आहे. अशा परिस्थितीत, वादी संस्थेने एका हफ्त्याची रक्म रु.२,५०,०००/- जमा केली. परंतु, त्यानंतरचे हफ्ते जमा न केल्यामुळे शासनाच्या

वतीने नियमाप्रमाणे कार्यवाही सुरु झाली असून वसुली करण्याबाबतच्या नियमांतर्गत शासनाच्या वतीने वादी संस्थेला सदरच्या नोटीसा ह्या दिल्या आहेत. अशा परिस्थितीत, नियमानुसार कार्यवाहीला कोणताही स्थगन आदेश देता येत नाही. अशा परिस्थितीत, वादी संस्थेला देण्यात आलेल्या दोन्ही नोटीसा या बेकायदेशिर किंवा अवैध अथवा नियमबाह्य असल्याबाबतची कोणतीही बाब वादीकडून अभिलेखावर आलेली नाही. अशा परिस्थितीत, तात्पुरता मनाई हुकूम नाकारला तर वादी संस्थेची कोणतीही अपरिमीत हानी होणार नाही. करीता, मी मुद्दे क्र.२ व ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

मुद्दा क्र.४ बाबत -

१०. वादी संस्थेने शासकिय योजनेंतर्गत रु.२०,००,०००/- चे कर्ज ८ हफ्त्यात परतफेडीच्या अटीवर घेतले असून त्यापैकी फक्त पहिल्या हफ्त्याची परतफेड केली व उर्वरित हफ्त्याची परतफेड केली नाही. वादी संस्थेला भरपूर वेळ व संधी देऊनही कर्जाची परतफेड आजपर्यंत केलेली नाही. अशा परिस्थितीत, शासकिय योजनेंतर्गत दिलेल्या कर्जाची नियमानुसार वसुली करण्याचे अधिकार शासनाला असून त्याच अधिकारांमुळे शासनाच्या वतीने वादीला नोटीसा देण्यात आल्या असून सदर नोटीसचे अवलोकन केले असता वादी संस्थेच्या थकित कर्जाची वसुली ही नियमाप्रमाणे करण्यात येणार असल्याचे त्यामध्ये नमूद आहे. अशा परिस्थतीत, नियमानुसार होणा-या कार्यवाहीला आडकाठी किंवा स्थगिती मिळण्याकरिता वादीच्या वतीने कोणताही सबळ व ठोस कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आला नाही. अशा परिस्थितीत, वादी हा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास पात्र व हक्कदार असल्याचे दिसून येत नाही. करिता, मुद्दा क्र.४ ला माझे मत नोंदवुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज निशाणी ६ नामंजुर करण्यात येतो.

२. कारणाकारणे खर्च.

Digitally signed by RAMESHWAR RAMKRISHNA RAUT
Date: 2023.08.05 12:07:39 +0530

( रा. रा. राऊत )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कंधार

दिनांकः ०५.०८.२०२३

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/order is same word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R. Kamble (L.G.) |
| Court | : | Civil Judge Senior Division, Kandhar |
| Date | : | 05/08/2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 05/08/2023 |
| Judgment/Order upload on | : | 07/08/2023 |